परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/१६२७ **दिनांक :** २९/०९/२०२५

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी २०२५ सत्राचे परीक्षा अर्ज : पाचवा टप्पा.**

संदर्भ : १.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/१५५४, दिनांक १४/०९/२०२५ (पहिला टप्पा)
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/१६०२, दिनांक २३/०९/२०२५ (दुसरा टप्पा)
३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/१६२१, दिनांक २७/०९/२०२५ (तिसरा टप्पा)
४.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/१६२४, दिनांक २७/०९/२०२५ (चौथा टप्पा)

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हिवाळी सत्र २०२५ च्या पहिल्या टप्प्यातील परीक्षा अर्ज दिनांक १५/०९/२०२५ पासून, दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा अर्ज दिनांक २४/०९/२०२५ पासून, तिसऱ्या टप्प्यातील परीक्षा अर्ज दिनांक २७/०९/२०२५ पासून आणि चौथ्या टप्प्यातील परीक्षा अर्ज दिनांक २७/०९/२०२५ पासून सुरू करण्यात आलेले आहेत. दिनांक ३०/०९/२०२५ पासून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे पाचव्या टप्प्यातील परीक्षा अर्ज सुरू होत आहेत.

सोबत जोडलेल्या यादीतील अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेचा कालावधी :—

| विद्यार्थ्यांने परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा नियमीत कालावधी | महाविद्यालय/संस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/संस्थेने विलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/संस्थेने विलंब व अतिविलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| **३०/९/२०२५ ते १०/१०/२०२५** | **३०/९/२०२५ ते १३/१०/२०२५** | **११/१०/२०२५ ते १३/१०/२०२५** | **११/१०/२०२५ ते १४/१०/२०२५** | **१४/१०/२०२५ ते १५/१०/२०२५ दुपारी १२ पर्यत** | **१४/१०/२०२५ ते १६/१०/२०२५ सायं. ५ पर्यत** | **१८/१०/२०२५ दुपारी २ पर्यत** |

महाविद्यालयाने वर दर्शवल्याप्रमाणे कोणत्याही टप्प्यावर परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतर विद्यार्थ्यांनी तात्काळ दोन दिवसामध्येच परीक्षा शुल्क ऑनलाईन स्वरुपात अदा करणे अनिवार्य आहे. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यांस आपोआप त्यापुढील विलंब शुल्क आकारले जाईल. तसेच दिनांक १८/१०/२०२५ दुपारी २.०० नंतर विद्यार्थी विलंबशुल्कासहही शुल्क भरू शकणार नाहीत आणि पर्यायाने संबंधित विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे जमा होणार नाही त्या विद्यार्थ्यास परीक्षेपासून वंचित रहावे लागेल, याची विद्यार्थ्यांनी व संबंधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज वेळेत भरून महाविद्यालयाकडे ऑनलाईन जमा केल्यावर आणि Preview Print सादर केल्यावर जर संबंधित महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचा अर्ज वरील रकान्यातील कालमर्यादित कायम झाला नाही तर संबंधित विद्यार्थ्यास भराव्या लागणाऱ्या विलंब अथवा अतिविलंब शुल्काचा भार आपोआपच महाविद्यालय/ परिसंस्थेवर पडेल.

..२/—

सबब, याद्वारे सर्व महाविद्यालये/परिसंस्था, प्राचार्य/संचालक, प्राध्यापक, विभागप्रमुख, महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी, परीक्षा सहायक कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना आवाहन करण्यात येते की, महाविद्यालय/परिसंस्थेतील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे/पाल्यांचे विहित मुदतीत अचूक परीक्षा अर्ज भरणे, तपासून कायम करणे आणि परीक्षा शुल्कही विहित कालावधीतच ऑनलाईन स्वरूपात भरणे; तसेच कोणताही पात्र विद्यार्थी/पाल्य परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तसेच विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ मिळणार नाही. कारण अशी मुदतवाढ झाल्यास परीक्षार्थी ओळखपत्र, बारकोड जुळणी आणि परीक्षार्थीच्या अभ्यासविषयांची निश्चिती करताना समस्या निर्माण होतात. परिणामी प्राचार्य/संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, परीक्षा अधिकारी, विद्यार्थी यांनाच स्थानिक पातळीवर रोषास सामोरे जावे लागते; पर्यायाने विद्यापीठ परीक्षा आयोजनावरही आणि त्याअनुषंगाने परीक्षा निकालांवर विपरित परिणाम होतो.

त्याचप्रमाणे विद्यापीठ संकेतस्थळावरून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात आणि हे पत्रक सर्वच संबंधित घटकांच्या माहितीस तात्काळ आणावे.

कळावे,

आपला,

**(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

सोबत :
मंगळवार दिनांक ३०/०९/२०२५ पासून परीक्षा अर्ज सुरु होणाऱ्या **पाचव्या टप्प्यातील** अभ्यासक्रमांची यादी.

टिप : ज्या विद्यार्थ्यांचे थेट प्रवेश दुसऱ्या वर्षातील तिसऱ्या सत्रात झाले आहेत तसेच २०१९ अथवा अगोदरच्या NON NEP 2020 पॅटर्नमधून NEP 2020 मधील कोणत्याही पॅटर्नमध्ये प्रवेशित आणि स्वायत्त महाविद्यालयातून/इतर विद्यापीठातून संलग्नित महाविद्यालयात NEP 2020 मधील कोणत्याही पॅटर्नमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज त्यासंदर्भातील निर्देशानंतर स्वतंत्रपणे सुरू करण्यात येतील.

विशेष सूचना :

१. हिवाळी सत्र २०२५ परीक्षांचे अर्ज कायम करताना संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने परीक्षार्थी विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती आणि सत्रपूर्ततेची काळजी घेणे अनिवार्य असून यासंदर्भातील सर्व कागदपत्रे महाविद्यालय स्तरावर जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. यासंदर्भातील सर्व जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची राहील.
२. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत परीक्षा अर्ज कायम करताना महाविद्यालय स्तरावर यासंदर्भातील सर्व कागदपत्रे जतन करणे आणि परीक्षा नियोजन कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षाकालीन अनुरूप सुविधा उपलब्ध करून देणे, वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

परीक्षा अर्ज भरण्यातील प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्रुटींसाठी ०२०-७१५३३६३३ या दूरध्वनीवर अथवा examsupport@pun.unipune.ac.in या मेलवर त्वरित संपर्क साधावा.

मंगळवार दिनांक ३०/०९/२०२५ पासून परीक्षा अर्ज सुरु होणाऱ्या पाचव्या टप्प्यातील अभ्यासक्रमांची यादी.

| Sr.No. | Faculty_Name | Pattern_Name |
|---|---|---|
| 1 | Humanities | BALLB (Rev.2017) |
| 2 | Humanities | BALLB Credit Pattern 2023 |
| 3 | Humanities | LLB (Rev.2017) |
| 4 | Humanities | LLB Credit Pattern 2023 |
| 5 | Humanities | LLM (Rev.2014) |
| 6 | Humanities | LLM (CBCS) PATTERN 2025 |
| 7 | Humanities | CCINFMJ |
| 8 | Humanities | DCCL |
| 9 | Humanities | DCIPRL |
| 10 | Humanities | DLLLW |
| 11 | Humanities | DTL (REV. 2018) |

पुनरावृत टिप :ज्या विद्यार्थ्यांचे थेट प्रवेश दुसऱ्या वर्षातील तिसऱ्या सत्रात झाले आहेत तसेच २०१९ अथवा अगोदरच्या NON NEP 2020 पॅटर्नमधून NEP 2020 मधील कोणत्याही पॅटर्नमध्ये प्रवेशित आणि स्वायत्त महाविद्यालयातून/इतर विद्यापीठातून संलग्नित महाविद्यालयात NEP 2020 मधील कोणत्याही पॅटर्नमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज त्यासंदर्भातील निर्देशानंतर स्वतंत्रपणे सुरू करण्यात येतील.

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ